# "प्रवासवर्णन – स्वित्झर्लंड"

युरोप म्हणजे कॅलिडोस्कोपच जणू....ऐतिहासिक राजवटींच्या जपलेल्या खाणाखुणा, मानवी कौशल्याचे पदोपदी दिसणारे नमुने, तंत्रज्ञानाचा चकित करणारा आविष्कार आणि डोळ्यांचं पारणं फेडणारा निसर्ग म्हणजे युरोप...शालेय जीवनात इतिहास–भूगोलातून काही अंशी उलगडलेला युरोप, प्रत्यक्ष पाहण्याचा अनुभव फारच आनंददायी होता...जगातल्या सात खंडांमधला दुसऱ्या क्रमांकाचा, लहान–मोठ्या देशांनी तयार झालेला संपूर्ण युरोप खंडच बघण्यासारखा असला तरीही स्वित्झर्लंडला तोड नाही, हेच खरं..!!!



स्वित्झर्लंड म्हणजे या धरणीवरचा साक्षात 'स्वर्गच' आहे ...हिरवीगार कुरणं, त्यामध्ये चरणाऱ्या धष्ट–पुष्ट गाई, हिरवी–पिवळी शेतं, रंगीबेरंगी फुलं, फार्म हाऊसेस, त्याभोवती मुक्तपणे वावरणाऱ्या गुबगुबीत शेळ्या–मेंढ्या, स्वच्छंदीपणे उधळणारे तगडे घोडे, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, फेसाळलेले धबधबे, भलेमोठे तलाव, उंचच उंच कारंजी, आल्हाददायक हवा आणि हिरवळीमध्ये अधूनमधून डोकावणारी सुबक लाकडी घरं... इथलं जगच कसं मन प्रफुल्लित करणारंय ...

अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करूनही पारंपरिक ऊर्जास्रोत या स्वर्गानं निगुतीनं जपल्याची साक्ष

गगनचुंबी पवनचक्क्या देत होत्या...गुळगुळीत रस्ते, अत्यंत उत्साहवर्धक वातावरण आणि उत्तम नागरी सुविधांमुळे तिथल्या नागरिकांचं दैनंदिन जीवन अधिक सुखदायक आहे ...

स्वित्झर्लंडमध्ये वाहतुकीचे नियम कडक असून चालकासाठी दिवसभरात ब्रेकसह ठराविक तासांचं कायदेशीर बंधन आहे ... सर्वच वाहनांमध्ये अद्ययावत संगणकीय यंत्रणा कार्यरत आहेत... इथे वाहनं रस्त्याच्या अगदी कडेला पदपथांना चिकटून धावतात... वाहनांच्या तर नाना तऱ्हा बघता आल्या ....अत्यंत आलिशान चारचाकींपासून छोट्या बाबागाड्यांचेही असंख्य प्रकार दिसले ... पालकांच्या दुचाकीला बाबा गाड्या जोडण्याची सोय होती...तीन चाकी गाड्यांची रचना तर आपल्या रिक्षापेक्षा बरोब्बर उलटी म्हणजेच पुढे दोन चाकं आणि मागे एक अशी ...इथल्या बसमध्ये गाईड किंवा चालक पुढच्या केबिन मधल्या माईकवरून मागच्या प्रवाशांशी संवाद साधतात ... टुरिस्ट स्पॉटला सुद्धा गाईड माईक वर बोलतो आणि पर्यटकांना इयर फोन दिले जातात, हे नवं तंत्रज्ञान आवडलं कारण भररस्त्यात, गर्दीतही सगळ्यांना माहिती स्पष्टपणे ऐकू येते आणि कोणाचीही चुकामूक होत नाही....

संपूर्ण युरोप महागडंच आहे पण स्विस जास्तच महाग आहे....अगदी नैसर्गिक विधीसाठीसुद्धा सार्वजनिक प्रसाधनगृहात तब्बल एक युरो मोजावा लागतो तेव्हा भारतीय पर्यटकांच्या मनात नक्कीच आकडेमोड होते...

स्वित्झर्लंड मध्ये शॉपिंग करणं हे एक श्रीमंतीचंच लक्षण म्हणायला हवं....कारण पै पै गोळा करून युरोप फिरायला गेलेल्या सर्वसामान्य पर्यटकांना इथं सहज खरेदी करणं दुरापास्तच असतं ....तरीही इथल्या काही वस्तूंची खासियत आहे... स्विस घड्याळं जगप्रसिद्ध आणि उच्च दर्जाची असून स्टेटस सिम्बॉल समजली जातात....तसंच स्वित्झर्लंडमध्ये दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणात असल्यानं चॉकलेट्स बरोबरच आईस्क्रीम, चीज, बटर आदी दुग्धजन्य पदार्थ सर्वोत्तम मिळतात...त्यासह इथे मिळणाऱ्या धारदार सुऱ्या जगभरात दुसरीकडे कुठेही मिळत नसल्यानं मी फक्त एक आठवण म्हणून दोन सुऱ्या आवर्जून आणल्या .... या देशात कमालीची स्वच्छता असून जवळपास ऐंशी टक्के कचऱ्याचा प्रक्रिया करून पुनर्वापर केला जातो ... तिथलं प्रशासन पर्यावरणप्रेमी असून तिथले स्थानिक काटेकोर, शांतताप्रिय, स्वयंशिस्त पाळणारे, निसर्गाशी एकरूप झालेले आहेत ... एक स्थानिक तर स्वतःहून हाय, हॅलो करत बोलायला आला ... इंडिया म्हटल्यावर त्याचा चेहरा खुलला ... त्याला भारताबद्दल थोडीफार माहिती होती ... बॉलिवूडच्या अनेक चित्रपटांचं शूटिंग तिथल्या भूमीत सतत सुरू असल्यानं चिनी, जपानी पर्यटकांनंतर भारतीय

पर्यटकांचा ओघ वाढल्याचं त्यानं सांगितलं... 'विंटरमध्ये पुन्हा या, मी तुम्हाला स्कीईंग शिकवेन', असं म्हणत टूरसाठी शुभेच्छा देत तो निघून गेला...यश चोप्रा यांच्या सिनेमांमधल्या दृश्यांमुळे भारतीय पर्यटक त्या देशाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित झाल्यानं, त्यांचा महसूल वाढल्यानं त्यांच्याबद्दलची एक कृतज्ञता म्हणून तिथल्या एका भल्यामोठ्या पार्कमध्ये चोप्रांचा पुतळा उभारलेला आहे ... एका भारतीयाचा त्या परकीय भूमीवर झालेला सन्मान बघून फारच छान वाटलं ... यासह एक भारतीय स्त्री म्हणून काळानुसार झालेला बदल मला याच टूरमध्ये सुखावून गेला तो म्हणजे, पॅरिसच्या एका पंचतारांकित हॉटेलात एक भारतीय मुलगी हॉटेल मॅनेजमेंटचं प्रशिक्षण घेत होती तर एका भारतीय पर्यटन संस्थेच्या ग्रुपची धुरा एक मराठी तरुणी वाहत होती .... भारतीय स्त्रीची पर्यटन क्षेत्रातली आंतरराष्ट्रीय पातळीवरची झेप पाहून फारच समाधान वाटलं....

स्वित्झर्लंडमध्ये फिरताना सतत इतिहासाच्या, विज्ञानाच्या खाणाखुणा नजरेस पडतात... शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईननं सापेक्षता वादाचा सिद्धांत मांडलेल्या स्विसच्या राजधानीत ‘बर्न’मध्ये फिरण्याचा अनुभव खूप छान होता... हा महान शास्त्रज्ञ याच शहरातल्या एका पेटंट कार्यालयात साधा कारकून म्हणून कार्यरत होता, हे ऐकून तर गंमतच वाटली...अस्वल हे त्या शहराचं ऐतिहासिक राजचिन्ह असल्यानं अनेक ठिकाणी छोट्या खंदकामध्ये ठेवलेली, मस्तीखोर ‘बेअर पिट्स’ पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत होती... अँरे नदीभोवती वसलेलं हे देखणं शहर ड्युक बर्थोल्ड यानं ११९१ मध्ये वसवलं ... स्टँडस्टोनच्या पुरातन वास्तू, ऐतिहासिक मनोरे, आकर्षक कारंजी यामुळे बर्न म्हणजे युरोपातलं मध्यमयुगीन वास्तूशैलीचा उत्कृष्ट नमुना मानलं जातं...

तब्बल दोनशे आंतरराष्ट्रीय संघटनांची कार्यालयं असलेल्या ‘जिनिव्हा’ शहराची सफरसुद्धा फारच आनंददायी होती ... लॅटिन भाषेतल्या शब्दावरून जिनिव्हा हे नाव प्रचलित झालं... स्वित्झर्लंड मधलं हे दुसऱ्या क्रमांकाचं शहर फारच प्रसन्न आहे... जिनिव्हा तलावातलं 'जेट दि इयु' हे उत्तुंग कारंज इथली शान आहे...ऱ्होन नदीकिनारी वसलेल्या या शहरातलं जगप्रसिद्ध 'फ्लॉवर क्लॉक' बघताना मन प्रफुल्लित झालं... १९५५ मध्ये सुमारे साडेसहा हजार फुलझाडांनी तयार केलेल्या या फुलांच्या घड्याळात जगभरातला एकमेव असा सगळ्यात लांब आणि मोठा सेकंद काटा आहे...इथल्याच बागेतल्या वॉकिंग ट्रॅकवर पडलेला केसांचा मोठा रबर कोणाचीही वाट न बघता, एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून एका स्थानिक महिलेनं स्वतःहून उचलून डस्टबिन मध्ये टाकला आणि एक सुज्ञ स्विस नागरिक असल्याचा धडा तिथल्या समस्त पर्यटकांना कृतीतून दिला....त्याच बागेतल्या आईस्क्रीम पार्लर मध्ये आम्ही आईक्रीम मागितलं... पण आमचा मूड ऑफ झाला .... तेव्हा ‘आमचा या देशातला आणि टूर मधला शेवटचा दिवस असल्यानं आम्ही लोकल करन्सी संपवत आहोत... आता आमच्या कडे फक्त अडीच फ्रँक शिल्लक असल्यामुळे आम्ही चार फ्रँकचं

आईस्क्रीम घेऊ शकत नाही', असं विक्रेतीला सांगताच 'नो प्रॉब्लेम' म्हणत तिनं दीड फ्रँकचा डिस्काउंट देत आईक्रीम दिलं तेव्हा आम्हाला कोण आनंद झाला....तिनंही हसतमुखानं आम्हाला बाय केलं त्यावेळी मनात आलं, लिपी वेगवेगळी असली तरी भावना व्यक्त करण्याची संपूर्ण जगाची एकच भाषा आहे ... ती म्हणजे 'हास्याची'... त्याच दिवशी जागतिक आरोग्य संघटनेचं मुख्य कार्यालय आणि रेड क्रॉसचं कार्यालय प्रत्यक्ष पाहिलं...हेन्री ड्युनॉड या स्विस नागरिकानं १८५७ मध्ये इटलीतल्या युध्दात भाग घेतला होता, त्यातल्या जखमींची स्थिती पाहून तो इतका अस्वस्थ झाला की, मानवतावाद, तटस्थता, स्वातंत्र्य, एकता, वैश्विकता, स्वेच्छासेवा या तत्वांच्या संकल्पनेतून संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली... या संस्थेचा ध्वज स्विस देशाच्या ध्वजाशी साधर्म्य असणारा आहे...ही इमारत बघत दिवस पुढे सरकत होता... त्याचवेळी 'यूएन' कार्यालयासमोर निदर्शनं सुरू होती, आशियाई म्हणून त्यांनी आम्हालाही सामील होण्याचं आवाहन केलं पण आमच्या गाईडच्या सांगण्यामुळे आम्ही त्यांना अजिबात प्रतिसाद दिला नाही.... त्याच भरचौकात उभारलेली भलीमोठी लालबुंद ब्रोकन चेअर बघत त्या खुर्चीचा इतिहास ऐकणं ही एक पर्वणीच होती....पण त्याहीपेक्षा त्या मागच्या चौकात थुईथुई नाचणारी छोटी कारंजी मला जास्त आवडली.....

जिनिव्हा मधलं चार्ली चॅप्लिनचं घर बघताना मी शैशवात गेले .... बालपणी दूरचित्रवाणीच्या कृष्णधवल पडद्यावर चार्लीचे पाहिलेले कॉमेडी शो आजही नजरेसमोर ताजे असतानाच साक्षात त्याच्या अवाढव्य बंगल्यात जाऊन पोहोचलो तो क्षण माझ्यासाठी खूप भावुक होता ... त्याचे फोटो, दैनंदिन जीवन, त्याचे पुरस्कार, चित्रीकरण स्टुडिओ, त्याची चित्रं–सही असलेल्या वस्तूंच्या विक्रीचं दालन सगळंच भव्यदिव्य होतं... आजही त्याचे वारस तिथे राहतायत ... दुःखाचं विनोदी अंगानं भांडवल करत त्याकाळी अमाप पैसा कमवणाऱ्या या जगप्रसिद्ध कलाकाराची एक गोष्ट मला फार आवडली ती म्हणजे त्यानं पूर्णतः स्वतंत्र राखलेलं व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्य....पडद्यावरचा चार्ली नक्की हाच का अशी शंका यावी इतकं....बंगल्याच्या आतल्या विश्वाबरोबरच बाहेरच्या आवारातले विविधरंगी गुलाब माझ्या मनपटलावर कायमचे कोरले गेले....

'टॉप ऑफ द युरोप' म्हणजेच पांढऱ्याशुभ्र हिमाच्छादित 'जुंगफ्राऊ' हे शिखर होय...या हिमशिखरावर नेणारी डोंगरातली रेल्वे म्हणजे मानवी तंत्रज्ञानाचा एक आविष्कारच आहे...सुमारे शंभर वर्षांपूर्वी तीन दशकं अथकपणे काम करून ही रेल्वे बांधण्यात आली ....तसंच माऊंट टिटलीसवर जाताना संबंध युरोपातल्या पहिल्या केबलकारचा अनुभव घेतला...जाता येताना दोहों बाजूंना सोनेरी किरणांमध्ये चमकणाऱ्या, मोहक ल्युसर्न पर्वतरांगा टिपणं निव्वळ अवर्णनीय आहे

... त्याच एका भल्या मोठ्या हिमशिखरावर एक गिर्यारोहक एकटाच चढत होता तेव्हा त्याच्या धाडसाचं मला प्रचंड कौतुक वाटलं ...



तसंच डोंगराच्या घळीत दडलेलं एक निसर्गशिल्प पाहून तर डोळ्यांचं पारणं फिटलं... तब्बल आठ मजली उंचीवरून कोसळणारा पांढराशुभ्र धबधबा पाहताना ‘पैसा वसूल’ हेच फीलिंग येतं....तर दुसऱ्या क्षणी तिथला ‘चॅपल ब्रिज’ बघताना स्थानिकांनी निसर्गाबरोबरच इतिहासाशी आजही जोडून ठेवलेली नाळ दर्शवतो ... ल्युसर्न शहराची ओळख असलेला ऱ्युस्स नदीवरचा हा लाकडी पूल १३३३ मध्ये बांधण्यात आला... १९९४ मध्ये त्याला भीषण आग लागली होती पण त्यांनी पुनर्बांधणी करून आपल्या शहराचं ऐतिहासिक मानचिन्ह निगुतीनं जपलं... तीच कथा ‘लायन मॉन्यूमेंटची’...फ्रेंच राज्यक्रांतीच्या दरम्यान मरण पावलेल्या स्विस सैनिकांच्या स्मरणार्थ १८२०/२१ मध्ये घायाळ सिंहाचं शिल्प सलग एकाच खडकात कोरण्यात आलंय... दगडी शिल्पातल्या सिंहाच्या चेहऱ्यावरचे सगळे दुःखी—कष्टी भाव निरखण्यासारखे असले तरीही आपल्याकडेही अनेक शिल्पकारांनी, कारागिरांनी, मूर्तिकारांनी  निर्जीव दगडातून सजीव केलेली शिल्पं, मूर्ती आठवल्या, फक्त त्यांचं असं मार्केटिंग करण्यात आपण कमी पडतो याची त्याक्षणी खंत सुद्धा वाटली...



असंख्य तलावांची ही निसर्गरम्य नगरी मला मनापासून आवडली ...थंडीमुळे इथल्या प्राण्यांसह अगणित रंगछटांचा निसर्गही मला गुटगुटीत वाटला ... प्रवासात अनेकदा ऊन—पावसाचा म्हणजेच युरोपमधल्या बेभरवशी हवामानाचा अनुभव घेतला ... पूर्वी जंगल कापण्यासाठी, खाणकामासाठी, रेल्वेच्या कामांसाठी म्हणून भारत, चीन,जपान देशांतून मजूर या देशात आणले गेले.. आता अनेक भारतीयांनी तिथे हॉटेल किंवा इतर व्यवसायात बस्थान बसवलंय ... पण काही भारतीय म्हणे तिकडचं नागरिकत्व मिळवण्यासाठी इकडे विवाह झालेला असतानाही तिकडे सुद्धा छुप्या पद्धतीनं लग्न करतात, ते ऐकल्यावर या व्यवहारी जगाचा थोडा रागही आला...

स्वित्झर्लंडनं दुष्काळच काय पण साधी ओहोटी सुद्धा पहिली नसेल इतकं मुबलक पाणी नद्या, तलावात असतानाही एका रेस्टॉरंटमध्ये दोन ग्लासनंतर तिसरा ग्लास प्यायचं पाणी द्यायला कर्मचारी महिलेनं नकार दिला, तेव्हा पाण्याला कधीच नाही म्हणून नये, असं म्हणणारी आपली थोर संस्कृती आठवली... पण त्याचवेळी तिथे ठिकठिकाणी प्राण्या—पक्ष्यांसाठी तयार केलेले हौद विशेष लक्षात राहिले....

जगभरातल्या अनेक देशांमधल्या मानवनिर्मित पर्यटनापेक्षा मला निसर्गसंपन्न युरोपातल्या पर्यटनानं अधिक आनंद दिला ... युरोपला उपजत वलय आहे, प्राचीन इतिहास आहे... संपूर्ण स्वित्झर्लंड फिरताना एकच न आवडलेली बाब म्हणजे जगभरातला काळा पैसा जमा असलेली 'स्विसबँक' .... मनात आलं स्विसबँकेत ठेवण्याइतका पैसा नसल्यामुळेच आम्हाला स्वित्झर्लंडचा मनसोक्त आनंद लुटता आला...त्या आनंदासह तिथला निसर्ग मनात, नजरेत, हृदयात साठवतच जगातल्या सर्वात गजबजलेल्या, स्विसची बौद्धिक आणि सांस्कृतिक राजधानी असलेल्या, लिमाट नदी किनारी वसलेल्या झ्यूरिक विमानतळावरून उड्डाण करून आम्ही मायदेशी परतलो....

**श्रद्धा वझे**
shraddhavaze72@gmail.com